# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२५/०६/२०१६.

## १) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा यांची कारवाई. :—

दिनांक २२/०६/०१६ ते दि. २४/०६/०१६ रोजी १०.५० वा. दरम्यान तक्रारदार यांची बहिण हिचे फेब्रुवारी २०१६ चे एच.एस.सी. परिक्षा ओळखपत्रामध्ये व उच्च माध्यमीक प्रमाणपत्र परिक्षा गुणपत्रीका मध्ये इंग्रजीत एस.एच.एम.आर.ए.ओ. अशा चुकीच्या नावाचा उल्लेख झाला होता, त्यामुळे त्यामध्ये एस.एच.ए.एम.आर.ए.ओ. अशा प्रकारे असणे गरजेचे होते, त्यामुळे तक्रारदार हे त्यामध्ये दुरूस्त करण्याकरीता आरोपीच्या हायस्कुल मध्ये गेले होते. त्या कागदपत्रा वरील स्पेलींग मध्ये दुरूस्ती करून देण्याकरीता आरोपीने १२,००/—रु. ची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारली. असे सर तर्फे फिर्यादि पोनि. श्री. पारधी एसीबी भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ७,१३(१)(ड),१३(२) ला.लु.प्र. कायदा १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोनि. पारधी एसीबी भंडारा हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

## २) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—

दिनांक २४/०६/०१६ रोजी १९.०० ते २०.०० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ डी ६३६७ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत कारधा चौक येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. मेश्राम वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. राठोड पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

## ३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २४/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०१ केसस, तिन सिटर वाहनांवरती १२ केसेस व इतर वाहनांवरती १२४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.